
ISBN-978-93-84593-96-4

Indian Council of Social Science Research (ICSSR) New Delhi
Sponsored National Seminar on

# Black Money and Its Impact on Indian Economy




Editor
**Dr.Abasaheb Hange**

ISBN-978-93-84593-96-4


| Sr. No. | Title of the Papers | Name of Authors | Page No. |
|---|---|---|---|
| 45 | भ्रष्टाचार रोखण्यामधील प्रसारमाध्समांची भूमीका आणि कार्य | रामानंद व्यवहारे | 143 |
| 46 | काळा पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेव होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 147 |
| 47 | काळा पैसा आणि त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हनूमंत भुमकर<br>कोकाटे जी.एस. | 150 |
| 48 | काळ्या पैशासंदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेची वास्तवीक परीस्थीती आणि परीणांमाचे विश्लेशन | डी.डी.भोसले | 153 |
| 49 | काळ्या पैशाचे भारतीय अर्थव्यवस्थेवरीले परीणाम | बोडगे एस.जी. | 156 |
| 50 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचे झालेले परीणाम | मनिषा चौधरी | 158 |
| 51 | काळ्या पैसा व भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारे परीणाम | हांगे ए.एस.<br>चौधरी व्ही.एम. | 160 |
| 52 | काळ्या पैशाचे अर्थव्यवस्थेवरील परीणाम | के.एस.घोडके | 163 |
| 53 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या परीणाम | रामदास मुक्टे | 166 |
| 54 | काळ्या पैशामुळे भारतातील समाजावर होणारे परीणाम | राठोड सुभाष | 169 |
| 55 | काळा पैसा आणि भारतीय अर्थव्यवस्था | साबळे एकनाथ | 172 |
| 56 | भारतीय अर्थव्यवस्था: निश्चलनीकरण आणि काळा पैसा | राम ताटे | 175 |
| 57 | भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचा परिणाम | सि.एस. वाकोडे<br>सि.एन. कोकाटे | 177 |
| 58 | काळा पैसा : भारतीय अर्थ व्यवस्थेवरील परिणाम | एस.जी.बिराजदार<br>एस.ए.सांगळे | 180 |
| 59 | भ्रष्टाचार : समाजाला लागलेली वाळवी | शिवाजी चौगुले | 1833 |
| 60 | भारतातील काळा पैसा : परिणाम व उपाय | शेळके सी.एस. | 186 |
| 61 | काळा पैसा एक सामाजिक समस्या | खेत्री एच.आर. | 190 |
| 62 | भारतातील काळा पैसा : कारणे, परिणाम व उपाय | डॉ. चव्हाण एम.एच. | 193 |
| 63 | भारतातील काळया पैशावर नियंत्रण : एकज्दृष्टोक्षेप | राम शेवलीकर | 198 |
| 64 | भारताचा काळा पैसा व भ्रष्टाचाराविरुध्दचा लढा | पोटे बी.टी | 200 |
| 65 | काळ्या व्यवहाराचे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रातील परिणाम. | दत्तात्रय नेटके | 204 |
| 66 | भारतीय अर्थव्यवस्था आणि काळा पैसा | देविदास नागरगोजे | 206 |


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचे परिणाम**

**प्रा.डॉ रामदास डी. मुक्टे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाचे पर्व सुरू झाले. ते म्हणजे सन १९५१ ला नियोजनाचा स्विकार होय. विकासाच्या १२ पंचवार्षिक योजना संपल्या तरी ही स्वातंत्र्यापासून असलेल्या दारिद्र्य, बेकारी ह्या समस्या संपल्या नाहित. अर्थव्यवस्थेसमोरील असलेल्या विविध समस्या मध्ये एका समस्येची भर पडली ती म्हणजे काळा पैसा विशेषतः १९८० च्या दशकापासून ह्या समस्येचा प्रभाव मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्थेत दिसून येतो. अलीकडील काळात काळापैसा ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. एवढेच नव्हे तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासातील एक अडसर म्हणून काळा पैसा ओळखला जात आहे. नियोजनाची उद्दिष्टये प्राप्त करण्यामध्ये काळ्यापैसाची अडचण समोर येत आहे. समाजातील जनतेचा पैसा, संपत्ती मिळविण्याच्या उद्देशाने गैरमार्गाने पैसा उपलब्ध करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात केला जात आहे. हा प्रयत्न गावपातळी ते राष्ट्रीय पातळी पर्यंत होत आहे. भारताच्या स्थूल उत्पादनाच्या जवळपास ४० टक्के काळा पैसा असल्याचा अंदाज व्यक्त केला जातो. तेव्हा शासनाकडून अनेक उपाय योजना तयार व त्याची अंमलबजावणी करून काळापैसा कमी करण्याचा व त्यातुन अर्थव्यवस्थेवर होणारे विपरीत परिणाम टाळण्याचा प्रयत्न केला जात आहे. विशेषतः समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी आर्थिक विकासासाठी अनेक उपाय योजना राबविण्यात येतात. परंतू ज्यांच्यासाठी योजना राबविल्या जात आहेत. त्यांनाच खऱ्या अर्थाने लाभ मिळत असल्याचा दिसून येत नाही. योजनाच्या लाभापासून गरीबवंचीत समाज वंचीतच राहत असून आर्थिक विषमता कमी होण्या एवजी त्यामध्ये भर पडण्याची भिती निर्माण होत आहे.

**काळ्या पैशाची संकल्पना**

**लांबा अनिल - जेव्हा लोक अवैध मार्गाने साधन संपत्तीचा साठा जमा करतात त्या साठयास काळापैसा असे म्हणतात.**[१]

सामान्य पणे काळापैसा म्हणजे जो पैसा अवैध मार्गाने मिळविलेला असतो, तसेच हा पैसा करपात्र उत्पन्नात दाखवलेला नसतो जसे की, करचोरी, भ्रष्टाचार व बेकायदेशीर पध्दतीतून निर्मान झालेला असतो.

**संशोधनची आवश्यकता**

भारतीय अर्थव्यवस्थेत काळापैसा ही एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. एकून अर्थव्यवस्थेच्या विकासाला काळापैसा हा गतीरोधक निर्माण झालेला आहे. अशा समस्यांची निर्मिती का झाली आहे व त्याचा एकुन अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होतो. याचा अभ्यास करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तुन संशोधन करण्यात आले आहे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तून संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या द्वितीय पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये विषयासबंधीत संदर्भ ग्रंथ व मासिके, वत्तपत्रे यातील लेख याचा समावेश होतो, या आधारे संशोधन कार्य करण्यात आले आहे.

**संशोधनाचा उद्देश**

१) काळा पैसा संकल्पना विश्लेषन करणे.
२) भारतीय अर्थव्यवस्थेतील काळा पैशाचा अभ्यास करणे.
३) भारतीय अर्थव्यवस्थेतील काळापैसा निर्मीती च्या कारणाचा अभ्यास करून परिणामाचे विश्लेषन करणे.

**भारतातील काळ्यापैशा विषयीचे अंदाज :**

भारतात सन १९६०-६१ च्या अनुमानाप्रमाणे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६.५ टक्के एवढा काळा पैसा भारतात होता. तर १९७५-७६ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन हे प्रमाण ११.४ टक्के झाले. नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ पब्लीक पॉलीसी (NIPFP) च्या अंदाजानुसार एकून राष्ट्रीय उत्पन्नाशी हे प्रमाण १९८३-८४ मध्ये ४६ टक्के तर १९८७-८८ मध्ये ५१ टक्के होते. तर पार्लमेंट स्टेडींग कमिटी ऑफ फायनान्स च्या अनुमानाप्रमाणे १९९४-९५ मध्ये १० लाख कोटी रुपये एवढा पैसा चलनात होता.[२] सी. बी. आय चे संचालक ए. पी. सिंग यांच्या मते ५०० बिलियन डॉलर भारतीयांनी काळापैसा विदेशात ठेवला आहे.[३] भारतीयांकडून विदेशी बँकात काळा पैसा दडवण्याचे प्रमाण यंदा कमी आल्याचे दिसत आहे. स्विझर्लंडच्या स्विस नॅशनल बॅंकेतर्फे प्रसिध्द करण्यात आलेल्या आकडेवारीमध्ये ही बाब स्पष्ट झाली आहे. आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये भारतीयांनी स्विस बॅंकेत सुमारे ६७५७ कोटी रुपये जमा केले. गल्या वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण ६ टक्यांनी घटले आहे.[४]





**काळापैसा निर्मितीची कारणे**

भारतातील काळ्या पैशाच्या प्रमाणाचा अभ्यास करतांना असे दिसून येते की, भारतात काळ्या पैशाचे प्रमाण जास्त असुन त्याचा अर्थव्यवस्थेच्या विविध घटकावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. काळा पैसा का निर्माण होतो याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे सांगता येतात.

१) वाढता भ्रष्टाचार
२) करप्रणालीच्या प्रभावी पणे अमलबजावणी अभाव
३) वस्तूंचा होणारा अपूरा पुरवठा
४) संपत्तीची आवड ५) रोख पैशातील व्यवहार
६) चोरीच्या मार्गाचे होणारे व्यवहार

इत्यादी प्रमुख मार्गाने काळा पैसा निर्माण होत असतांना दिसून येतो.

**भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचे परिणाम**

**१)अर्थव्यवस्थेतील आर्थिक विषमते मध्ये वाढ.**

समाजामध्ये काळ्या पैशाचे प्रमाण जास्त काळापैशामुळे संपत्तीच्या प्रमाणात वाढ होत असते. कारण काळापैशामुळे संपत्तीच्या प्रमाणात वाढ होत असते. पैशातुन पैसा निर्माण केला जातो. म्हणजेच काळ्या पैशाची गुंतवनूक केली जाते. त्यामुळे पुन्हा नफामध्ये वाढ होते. त्यातुन आर्थिक विषमता वाढत जाते.

**२)नियोजनाची उदिष्टये साध्य होत नाहीत.**

सरकाकडून विकासाचे उदिष्टे निश्चित केली जातात. त्यासाठी आर्थिक तरतुद केली जाते. उद्दिष्टये साध्य करण्यासाठी शासकीय स्थरावरुन योजनांची अंमलबजावणी केली जाते. परंतू यावेळी प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी खाजगी गुत्तेदार यांच्याकडून प्रशासकीय खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जातो. पैशाची अफरातफर केली जाते. याचा परिणाम नियोजनाची उदिष्टये पूर्ण होत नाहीत.

**३)सरकारच्या उत्पन्नामध्ये घट होते.**

सरकारचे उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे कर असते. परंतू काळापैसा हा करपात्र पैसा नसतो. कारण तो गैरव्यवहारातून आणि करचकवून मिळविलेला असतो. त्यामुळे जेवढा काळा पैसा जास्त असेल तेवढे जास्त सरकारचे उत्पन्न कमी होत असते.

**४) चलनवाढ होण्यास चालना मिळते.**

काळ्या पैशाच्या प्रमाणामुळे अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांची मागणी वाढत जात असते. याचा परिणाम वस्तू व सेवाच्या किंमतीमध्ये वाढ होण्याचा शक्यता निर्माण होत असते.

**५) वित्तीय धोरण अयशस्वी होण्याची शक्यता असते.**

भारत सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या कडून वित्तीय धोरण राबविले जाते. त्याआधारे अर्थव्यवस्थेतील एकूण पैशाच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. परंतू काळा पैशावर कोणतेही नियंत्रण नसते. त्यामुळे काळापैसा अर्थव्यवस्थेत बदल घडून आणतात. वित्तीय धोरण यशस्वी होण्याची शक्यता कमी असते. ते अपयशी होण्याची शक्यता असते.

**६) आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होते.**

काळा पैशा निर्मातीमुळे अर्थव्यवस्थेत आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होण्याची शक्यता असते. कारण समाजातील काही वर्गाकडेच हा पैसा असतो. व ते पैशाची गुंतवणूक करतात पुन्हा पैसा निर्माण करतात याचा परिणाम काही व्यक्तीकडेच पैशाचा मोठ्या प्रमाणात जमा होऊन आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होत असते.

**७)स्थावर मालमत्तेच्या किंमती मध्ये वाढ होते.**

अर्थव्यवस्थेतील स्थावर मालमत्ता उदा. जमिन, सोन-चांदी, भूखंड (प्लॉट) या सारख्या स्थावर मालमत्तेच्या किंमतीमध्ये वाढ होत असते. कारण काळापैसा हा अशाच प्रकारच्या संपत्ती मध्ये गुंतविला जातो. त्यामुळे या प्रकारच्या स्थावर संपत्ती, मालमत्तेच्या किंमतीमध्ये वाढ होत असते.

**८) शासकीय योजना अपयशी होतात.**

शासनाकडून अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी व अर्थव्यवस्थेतील विविध समस्या दूर करण्यासाठी विकासाच्या अनेक योजना राबविल्या जातात. मोठ्या प्रमाणात शासकीय खर्च केला जातो. परंतू योजनाची अंमलबजावणी करतांना त्यामध्ये भ्रष्टाचार, अनुदान रक्कमेची अफरातफर होत असतांना दिसून येते त्यामुळे योजनांच्या अपेक्षित प्रमाणात यश येतांना दिसत नाही.

**PRINCIPAL**
Shivaji College, HINGOLI

ISBN-978-93-84593-96-4

**९) आर्थिक विकासाला अडसर.**

काळापैसा अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाला अडसर निर्माण करीत असतो. कारण काळा पैसा निर्मितीच्या उद्देशाने योजना मध्ये भ्रष्टाचार निर्माण होतो. यामुळे नियोजनाची उद्दिष्ट्ये साध्य होऊ शकत नाही. दुसऱ्या बाजूनी काळा पैसा हा करचुकवगीर निर्माण होतो. परिणामी सरकारच्या उत्पन्नात घट होते. याचा एकंदरीत परिणाम आर्थिक विकासामध्ये अपेक्षित प्रमाणात वाढ घडून येत नाही.

**१०) अर्थव्यवस्थेत असुरक्षितता निर्माण होते.**

काळापैसाच्या वाढत्या प्रमाणामुळे देशात दहशतवाद यांसारख्या समस्याची निर्मिती होण्याची शक्यता असते. कारण अवैध मार्गांनी, चोरीच्या मार्गांनी मिळविल्या पैशाच्या मदतीने समाजात व्यक्ती दुसऱ्यावर प्रभुत्व गाजवण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यातून दंगे, जाळपोळ आणि दहशतवाद अशा प्रकारच्या घटना घडण्याची अवस्था निर्माण होते.

अशा प्रकारचे प्रमुख परिणाम काळापैशाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर होतांना दिसून येते.

**अर्थव्यवस्थेतील काळापैसा कमी करण्याचे उपाय.**

१) दर दहा वर्षांनी चलन बदल करणे.

२) संपत्तीचे पूर्णमुल्यांकण करणे.

३) कराचे दर कमी करून त्याची अमलबजावनी काटेकोरपणे करणे.

४) रोकड व्यवहाराला आळा घालणे.

५) भ्रष्टाचारी व्यक्तींना कडक शिक्षा केली जावी.

६) भ्रष्टाचार मार्गांनी मिळविलेल्या पैसा, सपंत्ती जप्त करून ती संपूर्णपणे सरकारच्या मालकीची केली जावी.

७) पाचशे, दोन हजार या सारख्या मोठे चलन पूर्ण पणे बंद करावे.

८)नियमित कर भरणाऱ्या करदात्यांचा सत्कार करणे त्यांना बक्षिस देणे.

इत्यादी उपायाची अमलबजावणी केल्यास अर्थव्यवस्थेतील काळापैसा निश्चितपणे कमी होऊ शकतो.

**संशोधनाची निष्कर्ष**

१) काळापैशामुळे अर्थव्यवस्थेत भाववाढ, आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण, आर्थिक विषमता या सारख्या समस्यामध्ये वाढ होत आहे.

२) काळापैसा भारतीय अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाला अडसर निर्माण झाल्याचा दिसून येतो.

३) काळापैसा व बेहिशेबी मालमत्ता असणाऱ्या व्यक्तीला कडक शिक्षा होतांना दिसुन येत नाही.

४) शासकीय खर्चामध्ये अधिक प्रमाणात भ्रष्टाचार व काळापैसा निर्मान होतांना दिसून येतो.

**संदर्भ**

१) वडवळे ए.पी, भारतीय अर्थव्यवस्था व काळापैसा मैत्री प्रकाशन, लातुर, २०१२, पृष्ठ.क्र. ४१९

२) अजय तगडपल्लेवार, भारतीय अर्थव्यवस्थेवर काळ्या पैशाचे परिणाम मैत्री प्रकाशन लातूर- २०१२, पृष्ठ.क्र.४१२

३) उपरोक्त संदर्भ क्र.१. पृष्ठ.क्र.४१८

४) दै. महाराष्ट्र टाईम्स - अर्थवृत्त दि.०१ जुलै २०१८.

५) दत्त सुंदरम, इंडीयन इकॉनॉमी- हिमालया पब्लिकेशन दिल्ली- २००१.

६) www.Indianblackmoney.Com

PRINCIPAL




ISBN-978-93-84593-96-4

**काळा पैसामुळे भारतातील समाजावर होणारा परिणाम**

**प्रा.डॉ. राठोड सुभाष प्रभू**
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
प्रतिष्ठान महाविद्यालय. पैठण,
जि.औरंगाबाद (मो.क्र. ७३५०३४००२८)

**प्रस्तावना :-**

व्यवहारामधून अवैधपणे वाचविलेला पैसा अधिकृतपणे उघडकीस आणला जात नाही. कर अधिकाऱ्यांपासून ते लपवून ठेवल्या जातो. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीत त्यांची नोंद होत नाही. यालाच काळा पैसा म्हणतात. असा पैसा उत्पादन कार्याकडे वळवला जात नाही. अशा प्रकारच्या व्यवहाराची व्याप्ती वाढवली तर देशात समांतर अर्थव्यवस्था निर्माण होत असते.

सरकारी धोरण म्हणजे काय ? देशातील बहुसंख्यांक जनतेचा सर्वांगीण विकास घडविणारे धोरण होय. एखाद्या देशाचा विकास किती झाला ? हे तेथील जनतेच्या दरडोई उत्पन्न आणि दरडोई कर्ज यावरुन ठरत असतो. जगात तीन प्रकार विकासासाठी प्रचलीत आहेत.

**(A) विकसीत देश :** अन्न, वस्त्र, निवारा पुर्णतः असते. सर्व सुविधा असतात, भौतिक सुख, जनता सुखी जीवन जगतात, जनतेची काळजी घेतात, पुर्णतः रोजगार याला विकसीत देश म्हणतात. उदा. जपान, इंग्लंड, ब्राझील, रशियाचे काही राष्ट्र.

**(B) अविकसीत देश :** यला मागास देश म्हणून ओळखला जातो. अन्न, वस्त्र, निवारा याकडे सरकारचे लक्ष असते, अतीमागास नाही, अती विकास नाही, ६०% जनतेचा विकास असतो, आर्थिक मदत करतात. जीवन जगण्यासाठी संसाधने धोरणात्मक अपूरी पडतात. गरीब देश म्हणून या गटातील देशाकडे पाहिले जाते. उदा. आफ्रिका खंडातील देश, सुदान.

**(C) विकसनशील देश :** अन्न, वस्त्र, निवारा यासाठी सरकारी धोरणाचे लक्ष नसते. मुलभूत गरजेची समस्या मोठ्या प्रमाणात असते. जीवन जगण्याच्या संसाधणे अपूरी असतात. अशा देशातील लोक दारीद्र्य अवस्थेत जीवन जगतात, रोजगार उपलब्ध नसतो. भुकबळीच्या कगारावर असतात. (कुपोषण) अशा अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी सर्व क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण करणे आवश्यक असते. २०% जनतेचा विकास असतो. शिक्षण/आरोग्य/संपत्ती यावर विशेष दृष्टीकोन असतो. सध्या भारतात बेरोजगारीची मोठी समस्या आहे. उदा. भारत, पाकीस्तान, बांग्लादेश.

विकसीत देश, अविकसीत देश व विकसनशील देश या तीन गटापैकी भारत हा विकसनशील देश आहे. अन्न, वस्त्र, निवारा अभाव असल्यामुळे बेरोजगारी, कुपोषण (भुकबळी) पात्रताधारक बेकार, विदेशी कंपनीत गुलामासारखे काम करताना दिसतात. एल.पी.जी. च्या धोरणामुळे भारतात विस्थापीत झालेल्या बहुराष्ट्रीय कंपन्यात १२ ते १८ कोटी सुशिक्षीत बेरोजगार सध्या भारतात काम करतात. तर भारत महासत्ता कसा होणार ?

**'नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ पब्लिक फायनान्स अॅण्ड पॉलिसी'** या संस्थेने केलेल्या अंदाजानुसार भारतात ३६७८६ कोटी रुपये (१९८३-८४) इतका काळा पैसा वापरत असावा. एकूण राष्ट्रीय उत्पनाच्या पैकी २०% काळ्या पैशाचे प्रमाण आहे[१]. काळा पैसा कोणाकडे असतो, राष्ट्रीय संपत्तीचा गैरवापर, विषमता निर्माण करणे, नियोजन कार्यात बाधा, राजसत्तेवर प्रभाव नैतीक मुल्याचे अधःपतन अशा अनेक घडामोडीमुळे काळा पैसा उद्भवत असतो.

**<u>१९९१ च्या नवीन आर्थिक धोरणामुळे, काळा पैशात झालेली वाढ</u>**

प्रत्येक निवडणूकीच्या वेळी किंवा अंदाजपत्रकाच्या वेळी काळ्या पैशाच्या बाबतीत देशवासीयांना कानावर येते. वास्तवीक हा काळा पैसा कोणाकडे आहे ? त्यांच्याकडे जमा कसा झाला ? काळा पैसा जमा करण्यासाठी कोणती योजना कारणीभूत ठरली ? ही योजना राबवीणारे कोण ? विशिष्ठ समाजाकडेच हा पैसा का जमा झाला ? याबाबतीत लोकसभा व राज्यसभेत चर्चा होती का ? ठोक असे निर्णय घेतले का घेतले जात नाही ?

सरकारने उदारीकरणाचे धोरण स्विकारले. राष्ट्रीय अर्थकारणाच्या दृष्टीने फक्त ब्राम्हण बनियांचा विकास म्हणजे संपूर्ण देशाचा विकास असे नियोजन कराचे मत बनले आहे.

| वर्ष | काळा पैसा |
|---|---|
| १९६२ | रु. ६५० कोटी |
| १९७२ | रु. ८११ कोटी |
| १९७८ | रु. २०,००० कोटी (राज्यमंत्री संतोष अग्रवाल यांची घोषणा) |
| १९८५ | रु. ८०,००० कोटी |
| १९९० | रु. ९०,००० कोटी |